# 17. राज्यपाल
## भाग VI कलम 153 ते 167

- स्वीकार - 1935 चा कायदा व कॅनडा.
- राज्यपाल हा घटकराज्याचा प्रथम नागरिक असतो.
- राज्यपाल हा त्या राज्याचा घटनात्मक प्रमुख असतो.
- राज्यातील सर्व विद्यापीठाचा कुलपती असतो.
- राज्यपाल हा उत्सवमूर्ती म्हणून ओळखला जातो.
- राज्यपाल हा राष्ट्रपतीचा प्रतिनिधी म्हणून ओळखला जातो.
- राज्यपाल हा नाममात्र प्रमुख व कार्यकारी प्रमुख म्हणुन ओळखला जातो.
- **कलम 153 -** प्रत्येक राज्यासाठी राज्यपाल असेल मात्र 7 वी घटनादुरुस्ती 1956 नुसार 2 किंवा अधिक राज्यासाठी राज्यपाल असेल.
- **कलम 154 -** राज्यपाल हा कार्यकारी प्रमुख म्हणुन कार्य करतो.
- **कलम 155 -** राज्यपालाची नेमणुक राष्ट्रपतीकडुन केली जाईल.
- **कलम 156 -** राज्यपालाचा कार्यकाल घटनेत निश्चित दिलेला नसला तरी सर्वसाधारण 5 वर्षाचा असतो किंवा राष्ट्रपतीला संबोधुन लेखी राजिनामा देऊ शकतो किंवा राष्ट्रपतीची मर्जी असेपर्यंत पद धारण करतो. राज्यपालाला निश्चित कार्यकालाची हमी दिलेली नाही आणि पदावरुन दूर करण्याचा आधार किंवा पद्धत सांगितलेली नाही.
- **कलम 157 -** राज्यपालाची पात्रता. भारताचा नागरिक. 35 वर्षे पूर्ण. **2 संकेत** 1) राज्याबाहेरी व्यक्ती असावा, 2) राष्ट्रपतीनी राज्यपालाची नेमणुक करताना संबंधित राज्याच्या मुख्यमंत्र्याचा सल्ला घ्यावा.
- **कलम 158 -** राज्यपाल पदाच्या सेवाशर्ती.
  संसद, राज्य विधीमंडळाचा सदस्य नसावा. शासकीय पदाचा लाभ घेणारा नसावा.
- **कलम 159 -** राज्यपालास पद आणि गोपनियतेची शपथ उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या किंवा ज्येष्ठ न्यायाधिशांच्या समक्ष घ्यावी लागते.
- **कलम 160 -** राष्ट्रपती राज्यपालांना आकस्मिक प्रसंगी वापरावयाचे अधिकार प्रधान करतील.
- **कलम 161 -** राज्यपालास क्षमादानाचा अधिकार आहे.
- **कलम 162 -** राज्यपाल आपल्या अधिकाराचा वापर प्रशासकीय अधिकाऱ्यामार्फत करतील.
- **कलम 163 -** राज्यपालाचा स्वविवेकाधिकार.

**महाराष्ट्रातील राज्यपाल 1960 ते 2023**

| क्र. | राज्यपाल | कालखंड |
|---|---|---|
| 1. | श्री प्रकाश | 1960-1962 |
| 2. | श्री. परमशीव सुब्बाराव | 1962-1962 |
| 3. | श्रीमती विजयालक्ष्मी पंडित | 1962-1964<br>(पहिली महिला) |
| 4. | पी.व्ही. चेरियन | 1964-1969 |
| 5. | अलियावर जंग | 1969-1976 |
| 6. | सादिक अली | 1976-1980 |
| 7. | आय.एच. लतीफ | 1980-1982 |
| 8. | ओमप्रकाश मेहरा | 1982-1985 |
| 9. | कोना प्रभाकर राव | 1985-1986 |
| 10. | डॉ. शंकर दयाळ शर्मा | 1986-1987 |
| 11. | श्री.के. ब्रह्मानंद रेड्डी | 1987-1990 |
| 12. | श्री.सी. सुब्रमण्यम् | 1990-1993 |
| 13. | पी.सी. अलेक्झेंडर | 1993-2002 |
| 14. | न्या.के.सी. ठक्कर (हंगामी) | 13 जुन ते<br>9 ऑक्टोबर 2002 |
| 15. | मोहम्मद फजल | 2002-2005 |
| 16. | श्री. एस.एम.कृष्णा | 2005-2008 |

| क्र. | राज्यपाल | कालखंड |
|---|---|---|
| 17. | एस.जी. जमीर | 2008-2010 |
| 18. | श्री.के. शंकरनारायण | 2010-2014 |
| 19. | सी. विद्यासागर राव | 2014-2019 |
| 20. | भगतसिंग कोश्यारी | 5 सप्टेंबर, 2019 पासून |

- **भारताचे पहिले राज्यपाल -** सी. राजगोपालाचारी
- **महाराष्ट्राचे पहिले राज्यपाल -** श्रीप्रकाश
- **सर्वाधिक काळ कार्य करणारे राज्यपाल -** पी.सी. अलेक्झेंडर (10 वर्षे)
- **एकमेव हंगामी राज्यपाल -** न्या.के.सी. ठक्कर
- **महाराष्ट्रातील पहिल्या महिला राज्यपाल -** श्रीमती विजयालक्ष्मी पंडीत.
- **भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल -** सरोजनी नायडू
- **सर्वात कमी काळ कार्य करणारे राज्यपाल -** परमशीव सुब्बाराव
- **महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करणारे राज्यपाल -** सादिक अली, सी. विद्यासागर राव, भगतसिंग कोश्यारी.
- भगतसिंग कोश्यारी हे महाराष्ट्राचे 19 वे राज्यपाल आहेत.

❍ **राज्यपालाचे अधिकार -**

**1) कायदेविषयक अधिकार**

- राज्यपाल हा त्या राज्याचा घटनात्मक प्रमुख म्हणुन ओळखला जातो.
- **कलम 188** नुसार राज्यपाल विधानसभा सभापती व विधानपरिषदेच्या अध्यक्षांना पद व गोपनीयतेची शपथ देतात.
- **कलम 174 -** राज्यपाल विधानसभा व विधानपरिषदेचे स्वतंत्र अधिवेशन बोलावतो.
- **कलम 176 -** राज्यपाल राज्यविधीमंडळाच्या दोन्हीही सभागृहासमोर अभिभाषण देतील.
- **कलम 200 -** धनविधेयक दोन्ही सभागृहाने पारित केल्यानंतर राज्यपाल अंतिम स्वाक्षरी करतात.
- **कमल 202 -** मंत्रिमंडळात अंदाजपत्रक मांडण्यापूर्वी राज्यपालाची पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.
- **कलम 171(3), 171(5) -** राज्यपाल विधानपरिषदेवर 12 नामवंत व्यक्तीची नेमणूक करतो.
- **कलम 333 -** विधानसभेवर राज्यपाल एक ॲग्लो इंडियन व्यक्तीची निवड करतील. (रद्द - 2020 च्या 104 वी घटनादुरुस्ती)

**2) कार्यकारी विषयक अधिकार**

- **कलम 163 -** राज्यपालास मदत करण्यासाठी मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ असेल अशी तरतूद आहे.
- **कलम 164(1) -** विधानसभेतील बहुमतवाल्या पक्षाच्या नेत्याची राज्यपाल मुख्यमंत्री म्हणून नेमणूक करतील.
- **कलम 164 (2)** मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ सामूहिकरित्या विधानसभेला जबाबदार असेल.

**3) न्यायविषयक अधिकार**

- राष्ट्रपती उच्च न्यायालयातील मुख्य न्यायाधीश नेमणूक करत असताना राज्यपालाचा सल्ला घेतील.
- विधी विद्यापीठाच्या कुलगुरुंची नेमणूक करणे (तीन विधी विद्यापीठे आहेत.) 1) औरंगाबाद, 2) मुंबई, 3) नागपूर
- कनिष्ठ न्यायालय, जिल्हा न्यायालय, खंडपीठे यातील न्यायाधीशांची नेमणूक करणे.
  1) औरंगाबाद, 2) नागपूर, 3) पणजी.
- **कलम 161 -** राज्यपालास क्षमादानाचा अधिकार आहे.

**4) अर्थविषयक अधिकार**

- **कलम 198 -** धनविषयक विधेयक ठरवण्याबाबतची सुचना राज्यपाल विधानसभेच्या सभापतीला देतो.
- **कलम 199 -** धनविधेयकाची व्याख्या केली आहे.
- **कलम 200 -** राज्यपालाच्या अंतिम स्वाक्षरीसाठी धनविधेयक राज्यपालाकडे पाठविता येईल.
- **कलम 207 -** धनविषयक विधेयकाचे राज्यपालाच्या स्वाक्षरीने कायद्यात रुपांतर होते.

**5) अंदाजपत्रक अधिकार**

- **कलम 202 -** मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाला अंदाजपत्रक मंत्रिमंडळात मांडण्यापूर्वी राज्यपालाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक असते.

**6) वटहुकूमविषयक अधिकार**

- **कलम 213 -** राज्यपाल राज्यामध्ये वटहुकूम किंवा अध्यादेश जारी करतो. त्यानुसार या वटहुकूमास राज्यविधिमंडळाकडून 6 आठवड्यात किंवा 6 महिन्याच्या आत मंजूर करुन घेणे बंधनकारक असते. अन्यथा वटहुकूम रद्द होतो.

**7) स्वविवेकाधिन अधिकार (कलम 163)**

- एकाच पक्षात बहुमत नसेल तर संयुक्त सरकारची स्थापना करणे.
- सरकार स्थापने अशक्य झाल्यास अनेक पक्षाचे मिळून संयुक्त सरकार स्थापन करणे.
- एखादे विधेयक राष्ट्रपतींच्या विचारात राखून ठेवणे.
- घटकराज्याची घटनात्मक यंत्रणा कोसळल्यास राष्ट्रपती राजवट लागू करण्याची राष्ट्रपतींना शिफारस करणे.
- शेजारच्या केंद्रशासित प्रदेशाचा प्रशासक म्हणुन काम करणे.
- वर्तमान मंत्रिमंडळाने विश्वास गमावल्यास विधानसभा बरखास्त करणे.
- मुख्यमंत्र्याचा आकस्मिक मृत्यू झाल्यास हंगामी किंवा काळजीवाहू मुख्यमंत्र्याची नेमणूक करणे.

**8) आणिबाणी विषयक अधिकार**

- कलम 356 - नुसार राष्ट्रपती राज्यपालाच्या सल्ल्यानुसार राज्यात घटनात्मक आणिबाणी लागू करतात. त्या काळात राज्यपाल हा घटनात्मक प्रमुख न राहता वास्तविक प्रमुख असतो.
- भारतात आजतागायत 127 वेळा घटनात्मक आणिबाणी राज्यपालाने लागू केली आहे.

# भारतीय राज्यव्यवस्था नोट्स

- घटनात्मक आणिबाणी एक वर्षापर्यंत कमीत कमी व जास्तीत जास्त 3 वर्षापर्यंत वाढविता येते.
- महाराष्ट्रात तीन वेळेस आणिबाणी लागू झाली आहे.
  1) कालावधी 17 फेब्रुवारी, 1980 ते 9 जुन, 1980. (मुख्यमंत्री - शरद पवार, राज्यपाल - फाजल अली, राष्ट्रपती - निलम संजीव रेड्डी)
  2) कालावधी 29 सप्टेंबर, 2014 ते 31 ऑक्टोबर, 2014 (मुख्यमंत्री - पृथ्वीराज चव्हाण, राज्यपाल - सी. विद्यासागर राव, राष्ट्रपती - प्रणव मुखर्जी)
  3) कालावधी 11 ते 22 नोव्हेंबर, 2019

**9) केंद्र व राज्य संबंध**

- राज्यपाल हा केंद्रशासन आणि राज्यशासन यांना जोडणारा दुवा म्हणून कार्य करतो.
- राज्यपाल हा जनतेचा प्रतिनिधी नसून तो राष्ट्रपतीचा प्रतिनिधी म्हणुन कार्य करतो.
- मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय प्रत्येक 15 दिवसाच्या आत राष्ट्रपतीस कळविणे.
- राष्ट्रपतीने मागवलेली माहिती राज्यपाल वेळोवेळी पुरवितो.